NEED 24 NEWS
DIGITAL E-PAPER
हर खबर, हर शहर
PRGI APPLICATION UNDER PROCESS
Application No. T/GJ/2026/0619/2304/1577
GST
GSTIN 24CINPG0564Q1ZT
UDYAM REGISTERED
UDYAM-GJ-14-0003714
www.need24.digital
info@need24.in
+91 98700 06472
FOLLOW US:
तेज़ | सटीक | निष्पक्ष | जनहित में | सच की आवाज़ | जन-जन की आवाज़ | निडर पत्रकारिता



# माळशेज घाटात एसटी बस आणि ट्रकचा भीषण अपघात; काही प्रवासी किरकोळ जखमी, दाट धुक्यामुळे चालकाचा ताबा सुटल्याची शक्यता.




**माळशेज घाटात एसटी बस आणि ट्रकचा भीषण अपघात; काही प्रवासी किरकोळ जखमी, दाट धुक्यामुळे चालकाचा ताबा सुटल्याची शक...**

**Kashinath Dhondu Desale, ठाणे।** Need 24 News जिल्हा रिपोर्टर काशिनाथ देसले. तालुका रिपोर्टर किशोर पवार. दिनांक २५/०९/२०२६. मुरबाड ठाणे विशेष वार्ता :: माळशेज घाटात एसटी बस आणि ट्रकचा भीषण अपघात; काही प्रवासी किरकोळ जखमी, दाट धुक्यामुळे चालकाचा ताबा सुटल्याची शक्यतामुरबाड / ठाणे (Need 24 News):माळशेज घाट परिसरात आज सकाळी एक भीषण अपघाताची घटना घडली आहे. महाराष्ट्र राज्य परिवहन मंडळाची (ST) बस आणि एका ट्रकची समोरासमोर जोरदार धडक झाली असून, या अपघातात काही प्रवासी किरकोळ जखमी झाले आहेत.मिळालेल्या प्राथमिक माहितीनुसार, आज २५ सप्टेंबर २०२६ रोजी सकाळी १०:३० वाजताच्या सुमारास माळशेज घाटातून जात असताना हा अपघात झाला. गेल्या काही दिवसांपासून घाट परिसरात सतत पाऊस आणि दाट धुके असल्यान...

# अभिनेता मुश्ताक खान यांचे कर्करोगाने निधन, मुंबईतील रुग्णालयात अखेरचा श्वास



**‘वेलकम’, ‘आशिकी’ आणि ‘गदर’ यांसारख्या चित्रपटांतील अभिनयासाठी ओळखले जाणारे हिंदी चित्रपटसृष्टीतील ज्येष्ठ अभिन...**

**शैलेष गुप्ता महाजन, मुंबई।** हिंदी चित्रपटसृष्टीतील प्रसिद्ध अभिनेते मुश्ताक खान यांचे गुरुवारी, २४ सप्टेंबर २०२६ रोजी निधन झाले. ‘वेलकम’, ‘आशिकी’, ‘मुझसे शादी करोगी’ आणि ‘गदर’ यांसारख्या चित्रपटांतील अभिनयाने प्रेक्षकांची मने जिंकणाऱ्या या अभिनेत्याने बऱ्याच काळापासून कर्करोगाच्या गंभीर आजाराशी झुंज दिली. वृत्तानुसार, मुश्ताक खान यांचे मुंबईतील नानावटी रुग्णालयात उपचार सुरू असताना निधन झाले. ते गेल्या सुमारे १५ दिवसांपासून रुग्णालयात दाखल होते आणि त्यांच्यावर उपचार सुरू होते. आपल्या अभिनय कारकिर्दीत मुश्ताक खान यांनी अनेक संस्मरणीय भूमिका साकारल्या आणि आपली एक वेगळी ओळख निर्माण केली. त्यांच्या निधनाने चित्रपटसृष्टीत शोककळा पसरली आहे.

## छत्रपती संभाजीनगरमध्ये गौस-ए-पाकचा ११ वा शरीफचा जुलूस उत्साहात संपन्न



**IMRAN BELIM।** छत्रपती संभाजीनगरमध्ये रविवारी हजरत गौस-ए-आजम अब्दुल कादिर जिलानी यांच्या ११ व्या शरीफचा जुलूस श्रद्धेने आणि उत्साहात काढण्यात आला. या निमित्ताने शहरात ठिकठिकाणी जलसे आणि महफिलींचे आयोजन करण्यात आले होते. जुलूसमध्ये मोठ्या संख्येने श्रद्धाळूंनी भाग घेतला आणि “या गौस-ए-आजम” च्या घोषणा दिल्या. हा जुलूस शहराच्या विविध मार्गांवरून निर्धारित स्थळी पोहोचला, जिथे प्रार्थनांचे आयोजन करण्यात आले. आयोजकांनी सांगितले की, हा एक वार्षिक सोहळा आहे, जो दरवर्षी मोठ्या उत्साहात साजरा केला जातो. या निमित्ताने लोकांनी शांतता आणि बंधुत्वाचा संदेश दिला.

## प्रज्वल घडशी मृत्यू प्रकरण: कारवाई न झाल्यास मुंबई-गोवा महामार्ग रोखण्याचा बहुजन विकास आघाडीचा इशारा



**Aniket Mestri।** संगमेश्वर: गणपती विसर्जनासाठी सोनवी नदीपात्रात उतरलेल्या प्रज्वल पुरुषोत्तम घडशी (रा. माभळे) यांचा नदीपात्रात तयार झालेल्या खोल खड्ड्यात बुडून मृत्यू होऊन पाच दिवस उलटले आहेत. मात्र, या प्रकरणात संबंधित महामार्ग ठेकेदारावर अद्याप कोणतीही ठोस कारवाई झालेली नसल्याने बहुजन विकास आघाडीने तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. संबंधित ठेकेदारावर मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करावा, अन्यथा प्रसंगी मुंबई-गोवा महामार्ग रोखण्याचा इशारा बहुजन विकास आघाडीचे अध्यक्ष सुरेश भायजे यांनी दिला आहे. मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्गाच्या चौपदरीकरणाच्या कामासाठी सोनवी नदीपात्रातून मोठ्या प्रमाणात गाळ काढून त्याचा महामार्गाच्या भरावासाठी वापर करण्यात आल्याचा आरोप ग्रामस्थांकडून क...

## लातूर/जळकोट:लातूर जिल्ह्यातील उदगीर आणि जळकोट तालुक्यामध्ये शासनाने अधिकृतपकोरडा दुष्काळ जाहीर;

**Kashinath Dhondu Desale, ठाणे।** जिल्हा रिपोर्टर ठाणे काशिनाथ देसले, तालुका रिपोर्टर किशोर पवार मुरबाड दिनांक २६/०९/२०२६.लातूर/जळकोट:लातूर जिल्ह्यातील उदगीर आणि जळकोट तालुक्यामध्ये शासनाने अधिकृतपकोरडा दुष्काळ जाहीर; आमदार संजय बनसोडे यांच्या पाठपुराव्याला यश, जळकोट-उदगीरच्या बळीराजाला कोरडा दुष्काळ जाहीर केला आहे. या निर्णयामुळे गेल्या अनेक दिवसांपासून संकटात सापडलेल्या स्थानिक शेतकऱ्यांना (बळीराजा) खूप मोठा दिलासा मिळाला आहे.उदगीर-जळकोट मतदारसंघाचे कार्यसम्राट आणि विकास पुरुष आमदार संजयजी बनसोडे साहेब यांनी या दुष्काळी परिस्थितीची गंभीर दखल घेतली होती. त्यांनी महायुती सरकारकडे सातत्याने आणि आक्रमकपणे पाठपुरावा केला होता. त्यांच्या याच अथक प्रयत्नांना अखेर यश आले असून सरकार...

## गोकर्ण महाबळेश्वर देखावा ठरला मुख्य आकर्षण; कल्याणमध्ये बाळ गोपाळ मित्र मंडळाचा ३७ वा पर्यावरणपूरक गणेशोत्सव मोठ्या उत्साहात संपन्न.

**Kashinath Dhondu Desale, ठाणे।** गोकर्ण महाबळेश्वर देखावा ठरला मुख्य आकर्षण; कल्याणमध्ये बाळ गोपाळ मित्र मंडळाचा ३७ वा पर्यावरणपूरक गणेशोत्सव मोठ्या उत्साहात संपन्न. २४ न्यूज ठाणेजिल्हा प्रतिनिधी: काशिनाथ देसले मुरबाड तालुका प्रतिनिधी: किशोर पवार दिनांक: २४/०९/२०२६ कल्याण (विशेष प्रतिनिधी): कल्याण पश्चिमेतील रामदासवाडी येथील नामांकित बाळ गोपाळ मित्र मंडळाचा सार्वजनिक गणेशोत्सव यंदा आपल्या ३७ व्या वर्षात पदार्पण करत असून तो अत्यंत उत्साही आणि भक्तीमय वातावरणात साजरा केला जात आहे. दरवर्षीप्रमाणे यंदाही मंडळाने आपल्या सामाजिक बांधिलकीचे आणि सांस्कृतिक वारशाचे भान राखत एक अत्यंत स्तुत्य उपक्रम हाती घेतला आहे. या वर्षीच्या गणेशोत्सवाचे मुख्य आकर्षण ठरले आहे ते म्हणजे कर्नाटक...

## ओतूर मार्केट यार्ड मध्ये भव्य रांगोळी स्पर्धा

**Ashok durgude, पुणे।** अखिल कृषी उत्पन्न बाजार गणेश मंडळ मार्केट यार्ड ओतूरमध्ये गणेश उत्सवानिमित्त रांगोळ्यांचे स्पर्धा घेण्यात आली यामध्ये मोठा गट लहान गट स्पर्धा झाली. परीक्षकांनी पाहणी करून गुण देणार आहेत त्याची घोषणा संध्याकाळी होम मिनिस्टर या कार्यक्रमात होणार आहे सुंदर रांगोळी काढल्याबद्दल मंडळाचे अध्यक्ष व उपाध्यक्ष व कार्यकारी मंडळाने सर्व स्पर्धकांचे आभार मानले आहेत.

## गणेश उत्सव निमित्त ओतूर मार्केटमध्ये रांगोळी स्पर्धेचे आयोजन



**Ashok durgude, पुणे।** अखिल कृषी उत्पन्न बाजार गणेश मंडळ मार्केट यार्ड ओतूर रांगोळी स्पर्धेचे आयोजन करण्यात आले यामध्ये लहान गट व मोठा गट दोन गटांमध्ये स्पर्धा झाली या स्पर्धेसाठी स्पर्धकांनी उत्कृष्ट पद्धतीच्या रांगोळ्या साकारल्या इंटरनेट असेल तसेच फुलांमध्ये असेल तसेच गणेशाची भोलेनाथ श्रीकृष्ण अशा अनेक प्रकारच्या रांगोळ्या स्पर्धकांनी काढल्या आणि ती पाहण्यासाठी बहुसंख्येने लोक उपस्थित होते मंडळ दरवर्षी हा उपक्रम राबवते यामुळे लहान मोठे या स्पर्धेत भाग घेतात आणि बक्षीस मिळवतात मुळात रांगोळी ही आपली संस्कृती आहे जी आपण प्रत्येक सणाला आपल्या घरासमोर काढत असतो आणि गणेशाच्या आगमनाने आनंदीत झाले. मंडळाचे सर्व पदाधिकारी या कार्यक्रमासाठी उपस्थित होते आणि यानंतर उत्कृष्...

## मुख्यमंत्री धाराशिवमध्ये दुष्काळग्रस्त भागाची पाहणी करणार



### राज्यातील दुष्काळी परिस्थितीचा आढावा घेण्यासाठी मुख्यमंत्री धाराशिव जिल्ह्याच्या दौऱ्यावर येत आहेत. या पाहणी द...

**shubham madake।** राज्यात सध्या दुष्काळाची परिस्थिती गंभीर बनत चालली आहे. या पार्श्वभूमीवर, मुख्यमंत्री धाराशिव जिल्ह्याच्या दौऱ्यावर येत असून, दुष्काळग्रस्त भागाची पाहणी करणार आहेत. या दौऱ्यादरम्यान मुख्यमंत्री शेतकऱ्यांशी थेट संवाद साधून त्यांच्या समस्या जाणून घेणार आहेत. तसेच, दुष्काळामुळे पिकांचे झालेले नुकसान आणि पाणीटंचाईच्या उपाययोजनांचाही ते आढावा घेतील. शासनाकडून दुष्काळग्रस्तांना मदत करण्यासाठी काय पावले उचलली जात आहेत, याचाही मुख्यमंत्री या पाहणीतून घेणार आहेत. शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी आवश्यक त्या सूचना संबंधित अधिकाऱ्यांना दिल्या जातील, अशी अपेक्षा आहे.

## रितु गार्डन परिसरात पाणीप्रश्नावर दिलासा: ४ इंचाची पाईपलाईन बदलून ६ इंचाची नवीन पाईपलाईन सुरू



**Pravin Brijlal Singh, मुंबई।** पाणीपुरवठ्याच्या कमी दाबाच्या समस्येने त्रस्त असलेल्या रितु गार्डन परिसरातील नागरिकांसाठी एक आनंदाची बातमी आहे. जुनी ४ इंचाची पाणी पाईपलाईन बदलून आता ६ इंचाची नवीन आणि मोठी पाईपलाईन कार्यान्वित करण्यात आली आहे. यामुळे परिसरातील पाणीदाब वाढण्यास मदत होईल आणि नागरिकांना पुरेसा पाणीपुरवठा होईल अशी अपेक्षा आहे. या नवीन पाईपलाईनचा फायदा प्रामुख्याने रितु गार्डन, साई एंक्लेव्ह आणि ऑर्नेट गॅलेक्सी या भागांतील रहिवाशांना होणार आहे. यापूर्वी या भागांमध्ये पाणी कमी दाबाने येत असल्याने नागरिकांना गैरसोयीचा सामना करावा लागत होता. नवीन पाईपलाईनमुळे ही समस्या मार्गी लागण्याची शक्यता आहे. स्थानिक प्रशासनाने पाणीपुरवठ्याच्या सुधारणेसाठी उचललेले हे पाऊल नाग...

## डोरली (भांडवलकर) येथील १६ महिलांचा समता सैनिक दलात प्रवेश



**Deepak Shankarrao Dhoke, नागपूर।** काटोल : तालुक्यातील डोरली (भांडवलकर) येथील १६ महिलांनी सामाजिक बांधिलकी जपत समता सैनिक दलात प्रवेश घेतला. काटोल येथे आयोजित कार्यक्रमात समता सैनिक दलाच्या जिल्हा पदाधिकाऱ्यांच्या उपस्थितीत नव्याने प्रवेश घेतलेल्या महिला सैनिकांचे स्वागत करण्यात आले. यावेळी डोरली (भांडवलकर) शाखेच्या अध्यक्ष, उपाध्यक्ष व संघटक पदांची निवडही करण्यात आली. “शील! शौर्य! बलिदान!!!” या ब्रीदवाक्याने तसेच “गाव तिथे शाखा, घर तिथे सैनिक” या संकल्पनेनुसार समता सैनिक दलाच्या माध्यमातून विविध सामाजिक उपक्रम राबविले जात आहेत. महिलांचा संघटनात्मक व सामाजिक कार्यातील सहभाग वाढविण्याच्या दृष्टीने डोरली (भांडवलकर) येथील १६ महिलांनी घेतलेला हा प्रवेश महत्त्वपूर्ण मानला जात आहे....

## लांजा तालुक्यात पावसाअभावी भात पिकांचे नुकसान; कृषी विभागाची पाहणी



**Aniket Mestri।** लांजा तालुक्यात पावसाने ओढ दिल्याने बेनी खुर्द आणि वाडगाव परिसरातील भात पिकांवर दुष्परिणाम दिसून येत आहेत. २६ सप्टेंबर रोजी कृषी विभागाच्या पथकाने या भागातील शेतीची पाहणी केली असता, पिकांच्या विविध अवस्थांमध्ये पावसाअभावी अडचणी निर्माण झाल्याचे स्पष्ट झाले. हळव्या भाताची पिके सध्या पक्वतेच्या अवस्थेत असून, कमी पावसामुळे काही शेतांमध्ये पिकांचे नुकसान झाल्याचे निदर्शनास आले. निमगरवा भात फुलोऱ्यात आहे, मात्र पावसाची कमतरता असल्याने दाणे भरण्याच्या प्रक्रियेवर परिणाम होण्याची शक्यता आहे. उंचावरील शेतांमध्ये भात पिकांची वाढही थांबल्याचे आढळले. गरवा भात फुलोऱ्यापूर्वीच्या अवस्थेत असून, पावसाअभावी त्याच्या वाढीवर परिणाम झाला आहे. काही ठिकाणी पिके...

## बँकातील जमा रक्कम चोरट्यांनी लुटली, पोलिसांनी २४ तासात ६ चोरट्यांची गिरफ्तारी

**Kashinath Dhondu Desale, ठाणे।** बँकात जमा करण्या साठी बाईक वर नेत असताना रक्कम चोरट्यांनी लुटली. पोलिसांनी २४ तासात ६ चोरट्यांना पकडून, त्यांच्या कडून रक्कम हस्त गत केली, पोलीस या मामल्याची सखोल चौकशी करीत आहेत. कोर्टने ६जणांना पोलीस कोठडी सुनवली आहे.

## पिंपळगाव बसवंतजवळ भीषण अपघात, सुदैवाने जीवितहानी टळली; मंत्री महाजन यांच्याकडून तातडीने मदत..!!

**Maheshprasad Dixit।** विभागीय प्रतिनिधी पिंपळगावजवळ ट्रक आणि मालवाहूचा भीषण अपघात; मंत्री गिरीश महाजन यांनी थांबवून केली मदत नाशिक : मनमाड व परिसरातील दुष्काळी भागाच्या पाहणी दौऱ्यावर जात असताना पिंपळगाव बसवंतजवळ मंत्री गिरीश महाजन यांना रस्त्यावर भीषण अपघात झाल्याचे निदर्शनास आले. ट्रक आणि छोट्या मालवाहू वाहनात झालेल्या या अपघातानंतर महाजन यांनी तात्काळ आपला ताफा थांबवून मदतकार्य सुरू केले. मिळालेल्या माहितीनुसार, पिंपळगावजवळ ट्रक आणि मालवाहू टेम्पोचा समोरासमोर जोरदार धडकेत अपघात झाला. अपघाताची माहिती मिळताच मंत्री महाजन यांनी घटनास्थळी धाव घेत दोन्ही वाहनांमध्ये अडकलेल्या जखमींना बाहेर काढण्यासाठी मदत केली. त्यांच्यासोबत असलेल्या कार्यकर्ते आणि सुरक्षा रक्षका...

## अनंत चतुर्दशीला शाळा सुरूच; विद्यार्थी आणि शिक्षकांसमोर बाप्पाला निरोप देण्याचा पेच



**Aniket Mestri।** रत्नागिरी जिल्ह्यात अनंत चतुर्दशीच्या दिवशी जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शाळा सुरू राहणार असल्याने विद्यार्थी आणि शिक्षकांसमोर एक मोठा पेच निर्माण झाला आहे. एका बाजूला सर्वत्र गणपती बाप्पाच्या विसर्जन मिरवणुकांचे उत्साहाचे वातावरण असेल, तर दुसरीकडे विद्यार्थ्यांना वर्गात बसावे लागणार आहे. जिल्हा प्रशासन आणि इतर शासकीय कार्यालयांना या दिवशी अधिकृत सुट्टी जाहीर करण्यात आली आहे, मात्र शाळांना सुट्टी न देण्याच्या निर्णयामुळे आश्चर्य व्यक्त केले जात आहे. अनंत चतुर्दशीला सुट्टी नसल्याने विद्यार्थ्यांना शाळेत हजेरी लावावी लागणार आहे. यामुळे, आपल्या लाडक्या बाप्पाला निरोप देण्याच्या मिरवणुकीत सहभागी होण्याची इच्छा असूनही विद्यार्थ्यांना शाळेतच थांबावे...

## लालबागचा राजाची भव्य विसर्जन यात्रा



**Ranjanben Dharmendrbhai Panchal, मुंबई।** मुंबईत गणेशोत्सवाची सांगता निमित्ताने, शहरातील सर्वात प्रसिद्ध गणेश पंडाल 'लालबागचा राजा'ची विसर्जन यात्रा श्रद्धा आणि उत्साहाच्या अद्भुत संगमाने संपन्न झाली. लाखो भक्तांनी 'गणपती बाप्पा मोरिया, पुढच्या वर्षी लवकर या' च्या घोषणा देत आपल्या लाडक्या बाप्पाला निरोप दिला. या भव्य विसर्जन यात्रेत विविध थीमवर आधारित झाक्या, डीजेच्या तालावर थिरकणारे तरुण आणि पारंपरिक नृत्यांनी वातावरण अधिक रोमांचक बनवले होते. पोलीस आणि स्वयंसेवकांनी सुरक्षा आणि व्यवस्थेसाठी कडक बंदोबस्त ठेवला होता, जेणेकरून कोणतीही अप्रिय घटना घडू नये. लालबागचा राजाची मूर्ती जड वाहनात ठेवून, तिला चौपाटी येथे नेण्यात आले, जिथे तिचे पर्यावरणपूरक पद्धतीने विसर्जन करण्यात आले. हे दृश्...

## कृषी उत्पन्न बाजार समिती जुन्नर उपबाजार ओतूर मार्केट तरकारी बाजारभाव

**Ashok durgude, पुणे।** कृषी उत्पन्न बाजार समिती जुन्नर उपबाजार आवार ओतूर मध्ये भाजीपाल्याची चांगली आवक झाली. बाजार भाव पुढील प्रमाणे प्रति १० किलो प्रमाणे फ्लॉवर ५० ते २००, कोबी ३० ते ८०, फरशी २०० ते ३००, काकडी ५० ते १५०, घेवडा २०० ते २६०, वाटाणा ३३० ते ५६०, दुधी भोपळा ५० ते १५० इत्यादी. अशी माहिती ओतूर कार्यालयातून प्राप्त झाली आहे.

## उमनपा अधिकाऱ्यांवर मोठी कारवाई, एका महिन्यात अहवाल देऊन चौकशीची मागणी



**Kunal Ashok Kapoor।** उल्हासनगर मनपाचे वादग्रस्त अधिकारी गणेश शिंपी यांना प्रभाग समिती सहायक आयुक्त पदावरून पदमुक्त करण्यात आले.. इतर ८ आरोपित अधिकारी-कर्मचाऱ्यांवर चौकशी समिती गठित करून आगामी १ महिन्यात अहवाल देऊन कारवाई केली जाईल.. उल्हासनगर मनपाच्या आरोपित अधिकारी, कर्मचाऱ्यांना प्रभारी पदांवरून हटवण्याची मागणी राष्ट्रीय कल्याण पक्षाचे अध्यक्ष शैलेश तिवारी यांनी २१ सप्टेंबर २०२६ पासून ठाणे जिल्हाधिकारी कार्यालयाबाहेर आमरण उपोषण सुरू केले होते. उपोषणच्या चौथ्या दिवशी संबंधित आरोपीत अधिकारी गणेश शिंपी, जे लघुलेखक वर्ग-३ पदावर होते, त्यांना सहायक आयुक्त (प्रभाग समिती क्र. २) तसेच कर-निर्धारक व संकलक, कर विभाग, निवडणूक विभाग प्रमुख पदावरून सहायक आयुक्त प्रभाग सम...

## कळवा भास्कर नगरचे 'टेबल का राजा' गणेश विसर्जनाचे आकर्षण ठरले

**Ritesh Dubey, ठाणे।** ठाणे जिल्ह्यातील कळवा भास्कर नगरमध्ये गणेश विसर्जन उत्साहात आणि सामुदायिक सहभागाने पार पडले. उत्सवाच्या सांगता विधीचा भाग म्हणून निर्धारित जलस्रोताजवळ विसर्जन सोहळा पार पडला. या कार्यक्रमादरम्यान, 'टेबल का राजा' या टोपणनावाने ओळखले जाणारे एक रहिवासी स्थानिक आकर्षणाचे केंद्र बनले. अनेक नागरिकांनी त्यांच्या उपस्थितीची नोंद घेतली. या टोपणनावाने परिसरातील लोकांमध्ये चर्चा आहे, ज्यामुळे धार्मिक उत्सवाला एक वेगळा मानवी पैलू मिळाला. पारंपारिक मंत्रोच्चार, संगीत आणि गणेश मूर्तीचे मिरवणूक यानंतर मूर्तीला पाण्यात विसर्जित करण्यात आले. भाविकांनी आणि अभ्यागतांनी पारंपरिक प्रार्थनांमध्ये भाग घेतला, ज्यामुळे उत्सवाची सांगता भक्ती आणि सामुदायिक सौहार्दाच...

## बहिणीच्या भेटीसाठी निघालेल्या दोन तरुणांचा बायपासवर काळाचा घाला; भरधाव वाहनाच्या धडकेत दोघे ठार....!!!




**Maheshprasad Dixit।** विभागीय प्रतिनिधी जळगाव - लहान बहिणीची भेट घेऊन मोठ्या बहिणीकडे जाण्यासाठी निघालेल्या दोन तरुणांच्या दुचाकीला भरधाव अज्ञात वाहनाने जोरदार धडक दिल्याने दोघांचा जागीच मृत्यू झाल्याची हृदयद्रावक घटना घडली आहे. हा अपघात २२ सप्टेंबर रोजी मध्यरात्री १ वाजेच्या सुमारास पाळधी ते तरसोद बायपासवरील आसोदा उड्डाणपुलाजवळ घडला. अपघातातील मृतांची नावे - १) पवन अनिल चौधरी (वय २९) २) युवराज भिका सोनवणे (वय ३४, दोघे रा. बिरोदा, जि. बऱ्हाणपूर, मध्यप्रदेश) पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, मध्यप्रदेशातील बिरोदा येथील पवन चौधरी हा त्याचा मित्र युवराज सोनवणे याच्यासोबत दुचाकी (क्र.एमपी ६८, झेडडी ९२३२) वरून यावल तालुक्यातील पाडळसे येथे लहान बहिणीला भेटण्यासाठी आला...

## रायसोनी नगरात भरदिवसा चोरीचा थरार; दुकानात घुसून महिलेचे मंगळसूत्र लंपास, दुचाकीवरून चोरट्यांचा पोबारा...!!!




**विभागीय प्रतिनिधी जळगाव : शहरातील रायसोनी नगर परिसरात भरदिवसा चोरीची धक्कादायक घटना घडली आहे. बॉल खरेदी करण्य...**

**Maheshprasad Dixit।** विभागीय प्रतिनिधी जळगाव : शहरातील रायसोनी नगर परिसरात भरदिवसा चोरीची धक्कादायक घटना घडली आहे. बॉल खरेदी करण्याच्या बहाण्याने आलेल्या दोन भामट्यांनी किराणा दुकानदार महिलेच्या गळ्यातील २० ग्रॅम वजनाची सोन्याची पोत जबरीने हिसकावून पोबारा केल्याची घटना सोमवारी सकाळी घडली. याप्रकरणी रामानंद नगर पोलीस ठाण्यात अज्ञात चोरट्यांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. नेमकं काय घडलं? रायसोनी नगर येथील रहिवासी सुमित्रा मनोहर खर्चे (वय ४९) यांनी त्यांच्या घराच्या कंपाऊंडमध्ये 'ओम प्रोव्हीजन' नावाने किराणा दुकान सुरू केले आहे. दि. २२ सप्टेंबर रोजी सकाळी साडेनऊ वाजेच्या सुमारास त्या दुकानात असताना तोंडाला रुमाल बांधलेले दोन तरुण दुचाकीवरून त्यांच्या दुकानाव...

## महिला सक्षमीकरणाच्या दिशेने मुरबाडमध्ये मोठे पाऊल! २०० हून अधिक महिलांनी घेतला शेतकरी दाखल्यांचा लाभ



**Kashinath Dhondu Desale, ठाणे।** महिला सक्षमीकरणाच्या दिशेने मुरबाडमध्ये मोठे पाऊल! २०० हून अधिक महिलांनी घेतला शेतकरी दाखल्यांचा लाभठाणे/ मुरबाड:महिला सक्षमीकरणाच्या दिशेने मुरबाड तालुक्यात एक अत्यंत महत्त्वपूर्ण आणि कौतुकास्पद पाऊल उचलण्यात आले आहे. फणसोली ग्रामपंचायत अंतर्गत महाराष्ट्र शासनाच्या 'महिला शेतकरी प्रमाणपत्र मोहिमे' अंतर्गत आज मुरबाड येथे महिलांसाठी विशेष 'शेतकरी दाखले' वाटप शिबिराचे यशस्वी आयोजन करण्यात आले होते.या शिबिराला मुरबाडमधील महिलांचा उदंड प्रतिसाद लाभला असून, तब्बल २०० हून अधिक गरजू महिलांनी या सुविधेचा थेट लाभ घेत आपले शेतकरी दाखले प्राप्त केले आहेत.प्रमुख उपस्थिती आणि मार्गदर्शन:या महत्त्वपूर्ण कार्यक्रमाला कृषी सहाय्यक अधिकारी माननीय मंडलिक साहेब,...

## लालबागचा राजाची भव्य विसर्जन यात्रा उत्साहात संपन्न



**Kalpeshkumar Narayanbhai Panchal, मुंबई।** मुंबईत गणेशोत्सवाच्या सांगतेनिमित्ताने, सुप्रसिद्ध 'लालबागचा राजा'ची विसर्जन यात्रा श्रद्धा आणि उत्साहाच्या अद्भुत संगमाने संपन्न झाली. या भव्य यात्रेत हजारो भक्तांनी भाग घेऊन 'गणपती बाप्पा मोरिया, पुढच्या वर्षी लवकर या'च्या घोषणा देत आपल्या लाडक्या देवाला निरोप दिला. लालबागचा राजाची मूर्ती भव्यरीतीने सजवण्यात आली होती आणि तिला एका खास सुशोभित वाहनात स्थापित करून शहराच्या रस्त्यांवर आणण्यात आले. यात्रेसदरम्यान, भक्तांचा उत्साह शिगेला पोहोचला होता. ढोल-ताशे, डीजेच्या तालावर आणि गणपतीच्या जयघोषाने वातावरण भक्तीमय झाले होते. ही विसर्जन यात्रा केवळ धार्मिक कार्यक्रम नव्हती, तर एक सामाजिक मेळावाही ठरली. विविध भागांतून आलेले लोक एकत्र येऊन उत्सा...

## रिसोडच्या सनराईज इंग्लिश स्कूलमध्ये ११ वा आयुर्वेद दिन उत्साहात साजरा; वृक्षारोपणाने दिला निसर्ग संवर्धनाचा संदेश



**Rameshwar Devidas Ranjwe।** दि आर्य शिक्षण संस्थेच्या सनराईज इंग्लिश स्कूल, रिसोड येथे २३ सप्टेंबर रोजी ११ वा आयुर्वेद दिन "एक स्वास्थ्य, एक भविष्य: पुराव्यांवर आधारित सायन्स, नाविन्यता आणि सर्वंगीण काळजीद्वारे आयुर्वेदाचे एकत्रीकरण" या संकल्पनेवर आधारित विविध उपक्रमांनी साजरा करण्यात आला. यानिमित्ताने इयत्ता नववीच्या विद्यार्थ्यांसाठी एक विशेष परिसंवाद आयोजित करण्यात आला होता. निरोगी जीवनशैलीसाठी आयुर्वेदाचे महत्त्व, वैज्ञानिक पुरावे, आधुनिक तंत्रज्ञान आणि सर्वंगीण आरोग्य सेवा यांची सांगड कशी घालावी, याविषयी विद्यार्थ्यांना माहिती देण्यात आली. कार्यक्रमाला प्रमुख अतिथी म्हणून डॉ. साक्षी परिहार आणि कु. रोशनी सरनाईक उपस्थित होत्या, ज्यांनी आयुर्वेदाची महती विशद केली. श...

## लालबागच्या राजाच्या चरणी ५ कोटी २५ लाखांचे दान, दर्शनाचा आज शेवटचा दिवस

**Hariom Borse, मुंबई।** मुंबईच्या लाडक्या लालबागच्या राजाच्या दर्शनाचा आज शेवटचा दिवस आहे. दहा दिवसांच्या गणेशोत्सवात देश-विदेशातून आलेल्या भाविकांनी बाप्पाच्या चरणी भरभरून दान अर्पण केले. या दहा दिवसांत लालबागच्या राजाच्या दानपेटीत तब्बल ५ कोटी २५ लाख ७० हजार रुपयांची रोकड जमा झाली आहे, जी गणेशभक्तांची अढळ श्रद्धा दर्शवते. गणेशोत्सवाच्या दहाव्या दिवशी, २४ सप्टेंबर रोजी भाविकांनी ५० लाख ३० हजार रुपयांचे रोख दान अर्पण केले. यापैकी मुख्य स्टेजवरील दानपेटीत ३४ लाख रुपये, तर रंगपेटीत १६ लाख ३० हजार रुपये जमा झाले. रोख रकमेसोबतच भाविकांनी सोने-चांदीचेही दान अर्पण केले. दहाव्या दिवशी ८८.६०० ग्रॅम सोने आणि ४ किलो ४९३ ग्रॅम चांदी बाप्पाच्या चरणी अर्पण करण्यात आली. गेले दह...

## अखिल महाराष्ट्र कुंभार समाजाचे माजी अध्यक्ष ह.भ.प. वामन धर्माजी शिंदे (कुंभार बाबा) यांचे ९२ व्या वर्षी निधन

**Kashinath Dhondu Desale, ठाणे।** अखिल महाराष्ट्र कुंभार समाजाचे माजी अध्यक्ष आणि एक आदरणीय व्यक्तिमत्व असलेले ह.भ.प. वामन धर्माजी शिंदे, जे 'कुंभार बाबा' या नावानेही ओळखले जात होते, त्यांचे ९२ वा वर्षी दु:खद निधन झाले. त्यांच्या निधनाने समाजात शोककळा पसरली आहे. कुंभार बाबा यांनी आपल्या जीवनकाळात कुंभार समाजाच्या उन्नतीसाठी आणि एकतेसाठी महत्त्वपूर्ण योगदान दिले. समाजाच्या विविध उपक्रमांमध्ये त्यांचा सक्रिय सहभाग असे आणि त्यांच्या मार्गदर्शनाखाली अनेक सामाजिक कार्ये यशस्वीपणे पार पडली. त्यांच्या दीर्घ आणि प्रेरणादायी कारकिर्दीत त्यांनी समाजाला नेहमीच सकारात्मक दिशा दिली. त्यांच्या निधनाने एक मोठी पोकळी निर्माण झाली असून, त्यांचे कार्य आणि विचार पुढील पिढ्यांसाठी मार्गदर्शक...